महाराष्ट्र शासनाचा २००४–०५ या वर्षाचा अतिरिक्त
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी गुरुवार, दिनांक २७ मे २००४ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

ार्थसंकल्पीय स्थिती.

१. मार्च २००४ मध्ये अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना रुपये ५३.६२ कोटीची शिल्लक राहिल, असा अंदाज व्यक्त केला होता पण या शिलकी अंदाजांत योजनांतर्गत व योजनेतर नवीन बाबींचा समावेश नव्हता. अतिरिक्त अर्थसंकल्पात या प्रयोजनार्थ रूपये ३८२०.५८ कोटीच्या निव्वळ खर्चासाठी तरतुद करण्यात आली आहे. जमेच्या बाजूला मी मुख्यत्वे केंद्र पुरस्कृत योजनांसाठीच्या (रूपये ३०१.६३ कोटी) अतिरिक्त जमा रकमा विचारात घेतलेल्या आहेत. अतिरिक्त अर्थसंकल्पामधील रूपये ११४४.१९ कोटींची तूट लक्षात घेता व अर्थसंकल्पात समावेश न केलेला रुपये ५२०९.२० कोटीचा नियतव्यय व वर्षारंभीची रूपये ९४९.९६ कोटींची तूट हिशोबात घेता, प्रारंभीची शिल्लक रुपये ७३०३.३५ कोटींच्या तुटीमध्ये परिवर्तीत होईल.

कर विषयक धोरण.

२. गेली ५ वर्षे या शासनाने जे करविषयक प्रस्ताव मांडले त्यामागे एक समान तात्विक भूमिका आहे. कराचे दर जर सुसह्य असले तर खर्च कमी झाल्यामुळे राज्यातील उद्योगधंद्यांची स्पर्धात्मकता तर वाढतेच पण किंमती कमी झाल्याने वस्तूंचा खप देखील वाढतो. ह्यामुळे रोजगारात वाढ होते आणि महसूल वाढतो. आता मी जे करविषयक प्रस्ताव सादर करणार आहे ते या भूमिकेशी सुसंगत असेच आहेत. ह्या मार्गाने पुढे गेले तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत राहील, महसूल वाढेल आणि शासनाची आर्थिक स्थिती सुधारेल असा मला विश्वास आहे.

कार्यपध्दती विषयक धोरण.

३. करव्यवस्था आणि करांचे दर यांचे सुसुत्रीकरण करायचे आणि कार्यपद्धतीत सुलभता आणायची असे मी ठरविले आहे. कार्यपद्धती गुंतागुंतीची असली तर कामाला लागणारा वेळ वाढतो आणि खर्च देखील वाढतो. म्हणून वेगवेगळ्या अधिनियमातील कार्यपद्धती सुलभ करण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. यामुळे प्रामाणिक करदात्यांना कराची रक्कम तत्परतेने भरणे सहज साध्य होईल.

उद्देश. ४. आर्थिक वाढ पाहिजे असेल तर करधोरणात सातत्य पाहिजे. म्हणून करांच्या दरात मी कमीतकमी बदल केले आहेत. मी जे कर प्रस्ताव मांडणार आहे त्यामुळे ज्या क्षेत्रात रोजगार वाढीला वाव आहे आणि ज्या क्षेत्रांशी गरीब लोकांचा सतत संबंध असतो त्या क्षेत्रात गतीशिलता निर्माण होईल. राज्यातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे शेती आणि शेतीचे जोडधंदे यांच्यावर अवलंबून असलेल्या लोकांना सहाय्य करण्य्राचा मी प्रयत्न केला आहे.

मूल्यवर्धित कर. ५. गेल्या वर्षी अर्थसंकल्प सादर करताना मी म्हटले होते की एप्रिल २००३ पासून देशातील राज्ये अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी एकात्म मूल्यवर्धित कर प्रणाली लागू करून एक अतिशय महत्वाचे पाऊल उचलणार आहेत. ह्यासाठी पूर्वतयारी म्हणून मूल्यवर्धित कर विधेयक दोन्ही सभागृहांनी मार्च २००३ मध्ये एकमताने मंजूर केले. त्यानंतर राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी ते विधेयक सादर करण्यात आले. परंतु राष्ट्रपतींची मान्यता अद्याप मिळालेली नाही. यामुळे मूल्यावर्धित कराची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली.

नोंदणी, निर्धारणा व अपीले. ६. मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली नोंदणी झालेल्या करदात्यांची संख्या आता सहा लाखापर्यंत गेली आहे. नोंदणीसाठी किमान उलाढालीच्या मर्यादेत गेल्या अनेक वर्षांत बदल झालेला नाही. तसेच कमी उलाढाल असलेले व्यापारी एकतर नगण्य कर भरतात किंवा त्यांना काहीच कर भरावा लागत नाही. अशा छोट्या करदात्यांना सहाय्य करून त्यांची कराच्या जाळ्यातुन सुटका करणे आवश्यक आहे. ह्या उद्देशाने मी नोंदणी, निर्धारणा आणि अपिल या संबधात महत्त्वाच्या सुधारणा करावयाचे ठरविले आहे.

पाच लाख रुपयांहून कमी उलाढाल असलेले फेरविक्रेते.

७. व्यापाऱ्यांच्या नोंदणीसाठी उलाढालीची वैधानिक मर्यादा सध्या किमान रुपये २.५० लक्ष इतकी आहे. ती वाढवून आता रुपये ५ लक्ष करण्याचे मी ठरविले आहे. ज्या फेरविक्रेत्यांची मागील वर्षीची उलाढाल पाच लाख रुपयांहून कमी होती त्या सर्वांची नोंदणीपत्रके कायद्यातील सुधारणेने आपोआप रद्द होतील. वेळच्या वेळी विवरणपत्रे भरणे, निर्धारणा करून घेणे, जमा खर्चाची पुस्तके ठेवणे अशा जबाबदाऱ्यांतून त्यांची मुक्तता होईल. ह्यामुळे विशेषतः ग्रामीण भागातील एक लाख छोट्या विक्रेत्यांना मोठाच दिलासा मिळेल अशी माझी अपेक्षा आहे. त्यांची संख्या नोंदीत व्यापाऱ्यांच्या २० टक्क्याच्या जवळपास आहे. मात्र दारू विक्रीच्या व्यवसायातील व्यापाऱ्यांच्या बाबतीत ही सवलत लागू होणार नाहीत.

तसेच उत्पादक आणि आयातदार यांच्या नोंदणीसाठी लागू असलेल्या किमान उलाढालीच्या मर्यादेत बदल होणार नाहीत. परंतु सध्या नोंदणीसाठी उत्पादन केलेल्या मालाची किंवा आयात केलेल्या मालाची किमान किंमत दहा हजार रुपये असणे आवश्यक आहे. त्याऐवजी उत्पादित मालाची अथवा आयात केलेल्या मालाची किमान किंमत पंचवीस हजार रुपये असावी असा बदल सुचवित आहे.

नोंदीत व्यापाऱ्यांची संख्या कमी झाल्यानंतर मोठ्या करदात्यांकडे लक्ष पुरविणे विक्रीकर विभागाला शक्य होईल. असा मला विश्वास आहे.

एकतर्फी निर्धारणा.

८. अनेक प्रकरणांमध्ये व्यापारी ठरलेल्या दिवशी निर्धारणा अधिकाऱ्यांच्या समोर हजर राहू शकत नाहीत त्यामुळे त्या प्रकरणांत एकतर्फी निर्धारणा आदेश पारित केले जातात. ह्या एकतर्फी आदेशांविरुद्ध अपिले दाखल होतात. अपिलाचा निर्णय देताना अपिल अधिकारी एकतर्फी आदेश सामान्यतः रद्द करून प्रकरण पुनश्च निर्धारणा अधिकाऱ्यांकडे परत पाठवितात. ह्या कार्यपद्धतीत वेळेचा अपव्यय होतो.

तसेच अपिलाचा मार्ग हा खर्चिक आणि वेळखाऊ आहे. अशा प्रकरणांत व्यापाऱ्यांनी जर अर्ज केला तर निर्धारणा अधिकाऱ्यांनाच एकतर्फी आदेश

रद्द करण्याचे अधिकार देण्याचे मी ठरविले आहे. ह्यामुळे अपिलांची संख्या कमी होईल, अशी मला खात्री वाटते.

अपिल मधील रिमांडची तरतूद रद्द.

९. प्रचलित पध्दतीमध्ये अपिल अधिकारी कोणतेही प्रकरण पुन्हा निर्धारणा करण्यासाठी खालच्या अधिकाऱ्यांकडे परत पाठवू शकतात. ह्यामुळे प्रकरणाचा अंतिम निपटारा होण्यासाठी जास्त वेळ लागतो. याचा विचार करून मी ठरविले आहे की अपिल अधिकाऱ्यांना प्रकरण निर्धारणेसाठी परत पाठविण्याचा अधिकार असू नये. ह्यापुढे अपिल अधिकारी त्यांच्या आदेशातच अंतिम निर्णय देतील. ह्यामुळे लघुउद्योजक व छोटे व्यापारी यांचा वेळ व पैसा वाचेल. तसेच ह्यामुळे अपिलाचा एक टप्पा कमी होईल. तथापि हा बदल विक्रीकर न्यायाधिकरणास लागू होणार नाही. दाखल झालेली अपिले कोणत्या क्रमाने निकालात काढली जावीत हे ठरविण्यासाठी काही नियम करण्याचे ही मी ठरविले आहे.

तसेच आदेशांमधील चुकांची दुरूस्ती करण्यासाठी असलेल्या तरतूदीची व्याप्ती वाढवायचे मी ठरविले आहे. त्यामुळे निर्धारणा आदेश पारित झाल्यानंतर जर पूर्वी न मिळालेली घोषणा पत्रे व्यापाऱ्यांना मिळाली तर त्यासाठी आदेशाची दुरुस्ती करता येईल.

व्याज.

१०. बाजारातील आणि बॅकांचे व्याजाचे दर आता बरेच कमी झाले आहेत पण विक्रीकर अधिनियमातील व्याजाचे दर मात्र गेली अनेक वर्षे बदललेले नाहीत. करदात्यांनी कराची रक्कम उशीरा भरली किंवा कमी भरली तर त्या रकमेवर त्यांना व्याज द्यावे लागते. तसेच एखाद्या आदेशाप्रमाणे करदात्यांना परतावा मिळाल्यास परताव्याच्या रकमेवर तसेच परतावा द्यायला उशीर झाला तर त्याबद्दल करदात्यांना व्याज मिळते. आता मी असे प्रस्तावित करतो की व्यापाऱ्याने उशीरा भरलेल्या करावर तसेच कमी भरलेल्या करावर २४ टक्क्यांऐवजी १५ टक्के दराने व्याज लावावे. करदात्यांना परताव्यावर आता बारा ऐवजी सहा टक्क्याने व्याज

मिळेल. तसेच परतावा देण्यास उशीर झाला तर त्या रकमेवर ९ टक्क्यांऐवजी ६ टक्के दराने व्याज मिळेल.

करातील सूट व परतावा.

**११.** विक्रीकर अधिनियमाखाली राज्य शासनाला सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अधिनियमाच्या कलम ४१ खाली करमाफी देण्याचे अधिकार आहेत. मूल्यवर्धित करप्रणालीत या प्रकारे करमाफी देण्याची तरतूद नसून एखाद्या संस्थेला सवलत द्यायची असेल तर ती भरलेल्या कराच्या परताव्याच्या रुपाने द्यावी लागेल. हे लक्षात घेता सध्याच्या विक्रीकर अधिनियमामध्ये यासाठी मी एक नवीन तरतूद प्रस्तावीत करीत आहे. सदर तरतुदीनुसार लाभार्थी संस्थेला करमाफी ऐवजी परतावा मिळेल. नवीन तरतुद यावर्षीपासून प्रायोगिक तत्त्वावर अंमलात आणण्याचा माझा प्रस्ताव आहे. ही एक पारदर्शक पध्दत आहे आणि शासनावर अशा सवलतींचा किती भार आला ह्याची माहिती आता मिळू शकेल.

ॉटरीवरील विक्रीकर.

**१२.** गेल्या काही वर्षात इलेक्ट्रॉनिक लॉटरी सह नवीन प्रकारच्या लॉटरी प्रचारात आल्या आहेत.त्यांची उलाढाल लक्षणीय आहे. ह्या लॉटरीवर कर लावण्यासाठी सध्याची करपध्दती अनुरुप नाही. लॉटरीवरील करआकारणीची पध्दत आणि कार्यपध्दती बदलणे आवश्यक आहे. मी आता ठरविले आहे की लॉटरीच्या विशिष्ट योजनेच्या बाबतीत प्रत्येक सोडतीगणीक लॉटरी तिकिटांच्या विक्रीच्या उलाढालीच्या आधारावर कर आकारावा.

परताव्यावर व्याज, कार्यकंत्राट, भाडेकरार आणि इतर अधिनियम.

**१३.** मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली १९९५ पासून परताव्यावर व्याज मिळते. कार्यकंत्राट आणि भाडेकरार अधिनियमाखालील परताव्यावर याचप्रमाणे व्याज देण्यात येत होते. सर्वोच्च न्यायालयाने अलिकडे असा निर्णय दिला आहे की, त्या त्या करविषयक अधिनियमात तशी विशिष्ट तरतूद असली तरच परताव्यावर व्याज देता येईल. भाडे करार अधिनियम व कार्यकंत्राट अधिनियम यात आवश्यक त्या सुधारणा करून परताव्यावर आणि उशिरा दिलेल्या परताव्यावर व्याज देण्याची सुधारणा करण्याचे मी ठरविले आहे.

तसेच ऐष आरामकर अधिनियमय,मोटार स्पिरीट विक्रीकर अधिनियम, ऊस खरेदी कर अधिनियम आणि व्यवसायकर अधिनियम ह्या अधिनियमांखालील परताव्यांवर व्याज देण्याची तरतूद आणि परतावा उशीरा दिला तर त्यावर व्याज देण्याची तरतूद त्या त्या अधिनियमांमध्ये करण्याचे मी ठरविले आहे.

मोटार स्पिरीट अधिनियमांखाली निर्धारणेसाठी कालमर्यादा.

**१४.** विक्रीकर विभाग गोळा करीत असलेल्या एकूण महसूलापैकी वीस टक्क्यांहून जास्त महसूल मोटार स्पिरीट कर अधिनियमाखाली मिळतो. या अधिनियमामध्ये निर्धारणेसाठी कालमर्यादेची तरतूद नाही. मुंबई विक्रीकर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे या अधिनियमातदेखील तशीच तरतूद करण्याचे मी ठरविले आहे.

ऊस खरेदीकर अधिनियमात देखील याप्रमाणेच तरतूद करण्याचे मी ठरविले आहे.

व्यवसायकर.

**१५.** व्यवसायकरातून मिळणारे उत्पन्न रोजगार हमी योजनेसाठी वापरण्यात येते. वेगवेगळया कारणांमुळे व्यवसायकराच्या प्रशासनात गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. ह्या प्रश्नांचा आढावा घेऊन त्यावर उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

ावसायकर धिनियमाखाली धीरणेसाठी ालमर्यादा.

१६. विक्रीकर अधिनियमात निर्धारणेसाठी जशी कालमर्यादा आहे तशी तरतूद व्यवसायकर अधिनियमात मालकांच्या निर्धारणे संदर्भात नाही. काही ठिकाणी मालकांच्या निर्धारणा अनेक वर्षे प्रलंबित आहेत. प्रश्नाची व्याप्ती आणि उपलब्ध साधनसामुग्री याचा विचार करून व्यवसायकर अधिनियमात विक्रीकर अधिनियमाप्रमाणेच निर्धारणेसाठी कालमर्यादा आणण्याचे मी ठरविले आहे. दिनांक १ एप्रिल २००४ पासून सुरु होणाऱ्या कालावधीसाठी ही तरतूद लागू होईल. एक प्रशासकीय बाब म्हणून दिनांक ३१ मार्च २००२ पूर्वीच्या कालावधीसाठी निर्धारणा करावयाच्या नाहीत असे मी ठरविले आहे. लघूउद्योगांना आणि छोट्या व्यावसायिकांना यामुळे मोठा दिलासा मिळेल. माझी अशी अपेक्षा आहे की, येत्या दोन वर्षात सन २००२ ते सन २००४ पर्यंतच्या निर्धारणा पूर्ण होतील आणि त्यानंतर व्यवसायकर अधिनियमाखाली केवळ चालू कालावधींच्या निर्धारणा शिल्लक राहतील.

व्यवसाय कराखाली वसुली व सर्वेक्षण.

१७. दोन वर्षांपूर्वी मी एक नवीन योजना जाहीर केली आणि त्यानुसार व्यवसायकर अधिनियमाखाली वसूली तसेच नवीन करदात्यांच्या सर्वेक्षणाचे काम सुशिक्षित बेरोजगार महिला व अल्पबचत अभिकर्त्यांकडून करून घ्यायचे ठरविले. शिल्लक राहिलेले काम आणि कामाचे विशेष स्वरुप लक्षात घेता विक्रीकर विभागाच्या कर्मचाऱ्यांनादेखील योजनेत सहभागी करून घ्यायचे मी ठरविले आहे. विभागीय कर्मचाऱ्यांना हे काम कार्यालयीन वेळेनंतर आणि सुट्टीच्या दिवशी करता येईल. सुशिक्षित बेरोजगार महिला आणि अल्पबचत अभिकर्त्यांना ज्या दराने आणि प्रमाणात प्रोत्साहनपर रक्कम मिळते त्याच दराने आणि प्रमाणात विक्रीकर विभागाच्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम दिली जाईल.

गुटका.

१८. सन्माननीय सभादांना माहीत आहे की, राज्य शासनाने गुटक्याचे उत्पादन आणि विक्री यावर बंदी घातली आहे.परंतू गुटका व्यापाऱ्यांची जुन्या कालावधीसाठी निर्धारणा पूर्ण करणे आवश्यक आहे.

न्यायालयाच्या एका निर्णयामुळे गुटक्याचे योग्य वर्गीकरण काय असावे यासंबंधी शंका उत्पन्न झाली आहे. या मुळे महसूल हानी होऊ नये म्हणून अधिनियमामध्ये काही प्रतिबंधक उपाय अंतर्भूत करण्याचे मी ठरविले आहे.

**उत्पादकांना मिळणारी वजावट.**

**१९.** राज्यातील उद्योगधंदे आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ह्या क्षेत्रात संपत्ती आणि रोजगार निर्माण होतात. कराचा मुख्य बोजा याच क्षेत्रावर पडतो ही वस्तुस्थिती आहे. आर्थिक शिथीलीकरणाच्या धोरणामुळे परदेशी वस्तू खुल्या बाजारात उपलब्ध होत आहेत. या परिस्थितीत स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देणे अधिकच आवश्यक झाले आहे. प्रचलित करपध्दतीत कच्च्या मालावर आकारलेल्या करामुळे वस्तूंच्या किंमतीत वाढ होते. तेव्हा कच्च्या मालावरील कराचा बोजा कमी करणे आणि स्थानिक पुरवठादारांना चांगल्या संधी उपलब्ध करून देणे या दोन्ही गोष्टी आवश्यक ठरतात. येत्या तीन वर्षात कच्च्या मालावरील कराचा बोजा पूर्णपणे काढून टाकण्याचे मी ठरविले आहे. महसूलात तूट येऊ नये म्हणून ही योजना टप्याटप्याने अंमलात आणणे आवश्यक आहे.

सध्या उत्पादकांनी जर मालाची विक्री केली तर खरेदी केलेल्या कच्च्या मालावरील तसेच खरेदीवर तीन टक्क्यांपेक्षा अधिक दराने आकारलेला विक्रीकर वजावट म्हणून परत मिळतो. मी असे प्रस्तावित करतो की, यावर्षापासून कच्च्या मालाच्या खरेदीवर २ टक्क्यांपेक्षा अधिक दराने आकारलेला विक्रीकर वजावट म्हणून परत मिळावा.

तसेच तयार माल विकण्याऐवजी ब्रँच ट्रान्सफरच्या मार्गाने इतर राज्यात पाठविला तर खरेदीवर ६ टक्क्यांपेक्षा अधिक दराने आकारलेला विक्रीकर वजावट म्हणून मिळतो. यावषार्पासून जर तयार माल ब्रँच ट्रान्सफरच्या मार्गाने इतर राज्यात पाठविला तर खरेदीवर ३ टक्क्यांपेक्षा जास्त दराने आकारलेला विक्रीकर वजावट म्हणून परत मिळेल. तसेच जर तयार माल परप्रांतात ब्रँच ट्रान्सफरच्या रीतीने पाठविला तर ज्या कच्च्या मालावर

मुळात ४ टक्के विक्रीकर आहे त्याच्या खरेदीवर जास्तीचा जो २ टक्के खरेदीकर लागतो, तो मी काढून टाकत आहे.

जे उत्पादक करमुक्त वस्तू तयार करतात त्यांना खरेदीवर ४ टक्क्यांपेक्षा जास्त दराने आकारलेला विक्रीकर वजावट म्हणून मिळतो. यावर्षापासून खरेदीवर ३ टक्क्यांपेक्षा जास्त दराने आकारलेला विक्रीकर त्यांना वजावट म्हणून मिळेल. या सर्व सवलतींमुळे औद्योगिक कच्च्या मालाची स्थानिक खरेदी वाढेल आणि सुटे भाग तयार करणाऱ्या छोट्या उत्पादकांना प्रोत्साहन मिळेल. माझी अशी खात्री आहे की, यामुळे महाराष्ट्रातील रोजगारात भरीव वाढ होईल.

उत्पादनात वापरल्या गेलेल्या भांडवली मत्तेच्या खरेदीवर चार टक्क्यापेक्षा अधिक आकारलेला विक्रीकर वजावट म्हणून परत मिळतो. या वर्षीपासून दोन टक्क्यापेक्षा अधिक आकारलेला विक्रीकर भांडवली मालमत्तेच्या खरेदीवर वजावट म्हणून परत मिळेल.

नजीकच्या भविष्यकाळात केंद्रीय विक्रीकर अधिनियमाखालील कराचे दर कमी होण्याची शक्यता आहे. दर कमी होतील तेव्हा करमुक्त वस्तूंचे उत्पादन केल्यास मिळणाऱ्या किंवा तयार माल ब्रँच ट्रान्सफरच्या रीतीने इतर राज्यात पाठविल्यास मिळणाऱ्या वजावटीत त्याच प्रमाणात वाढ केली जाईल.

**रेस्टॉरंटवरील कर आकारणी.**

**२०.** रेस्टॉरंटवरील कर आकारणीसाठी उलाढालीच्या टप्प्यानुसार कर भरण्याची पद्धती आहे. ही पद्धत सर्वसामान्यत: ठीक चाललेली आहे. मात्र ज्या व्यावसायिकांची आधीच्या वर्षाची उलाढाल पन्नास लाख रुपयांहून जास्त आहे त्यांना चालू वर्षी टप्प्यानुसार कर भरण्याची सवलत मिळत नाही. ही अट काढून टाकण्याचे मी ठरविले आहे.

रेस्टॉरंटसाठी प्रशासकीय सवलत.

**२१.** मूल्यवर्धित करप्रणाली एप्रिल १९९९ मध्ये रद्द करण्यात आली आणि त्यावेळी उलाढाल कर आणि अधिभार लागू केले. सध्या रेस्टॉरंट्सची कर आकारणी विक्रीच्या उलाढालीच्या टप्यांप्रमाणे होते. कायद्याचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे काही रेस्टॉरंटसनी नव्याने लागू झालेला उलाढाल कर आणि अधिभार भरला नाही. अशा रेस्टॉरंटनी ३० सप्टेंबर २००४ पर्यंत उलाढालकर व अधिभार यासह सर्व कर भरले तर उलाढाल कर आणि अधिभार उशीरा भरल्यामुळे लागणाऱ्या व्याज व दंडाची मागणी माफ करण्याचे मी ठरविले आहे.

सवलती.

**२२.** गेल्या संपूर्ण वर्षात माझ्याकडे विविध संघटनांकडून वेगवेगळ्या वस्तूंवरील करांच्या दरासंबधी अनेक निवेदने आलेली आहेत. त्यांचा गुणवत्तेवर विचार करून काही सवलती द्यायचे मी ठरविले आहे.

महाराष्ट्रातील मध उत्पादक सहकारी संस्थांनी केलेली मधाची साठ लाख रुपयांपर्यंतची विक्री करमुक्त करण्याचे मी प्रस्तावित करतो. कोकणामध्ये काजुचा रस हे एक नवीन उत्पादन सुरू झाले आहे. कोकणामधील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ह्या उत्पादनाला करमाफी देण्याचे मी ठरविले आहे. रिठा हे फळ मुख्यत: कोकणामध्ये मिळते. त्यालाही करमाफी देण्याचे मी ठरविले आहे. पेट्रोल मध्ये इथॅनॉल मिसळण्यास केंद्र शासनाने आता मान्यता दिली आहे. इथॅनॉलच्या स्थानिक पुरवठादारांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी तेल कंपन्यांना पुरविलेल्या इथॅनॉलच्या विक्रीवरील उलाढालकर आणि अधिभार माफ करण्याचे मी ठरविले आहे.

सर्व प्रकारचे विजेचे बल्ब तसेच फ्लोरोसन्ट टयुब आणि चोक, स्टार्टर्स यांसह त्यांच्या जोडण्या व घटक भाग यावर कराचा दर तेरा टक्के आहे. तो कमी करून आठ टक्के करायचे मी ठरविले आहे.

प्लॅस्टिकच्या वस्तूंवर कराचा दर १३ टक्के आहे. तो कमी करून ८ टक्के करायचे मी ठरविले आहे. विजेच्या तारा व केबल्स यांच्यावरील कराचा दर १३ टक्के आहे. हा कमी करून ८ टक्के करायचे मी ठरविले आहे. ठिबक सिंचन यंत्रणा व यंत्रणेच्या सुट्या भागांवरील फेरविक्रीकर माफ करण्याचे मी ठरविले आहे. ज्या सिमेंट ब्लॉक्सच्या उत्पादनात औष्णिक राख वापरली जाते त्या सिमेंट ब्लॉक्सवरील कराचा दर १३ टक्क्यांवरुन कमी करून त्यावर वीटेवरील कराप्रमाणे ८ टक्के दराने आकारणी करायचे मी ठरविले आहे.

काही प्रकारच्या विजेच्या तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर २० टक्के दराने कर लागतो. त्याऐवजी १३ टक्के दराने कर लागेल. सार्वजनिक वितरण व्यवस्थेव्यतिरिक्त जे केरोसिन विकले जाते त्यावरील कराचा दर देखील २० टक्क्यावरुन कमी करून १३ टक्के केला जाईल. कार्बन पेपर व टाईपरायटरची रिबन यावरील कराचा दर १३ टक्क्यावरुन कमी करून अनुक्रमे ८ व ४ टक्के केला जाईल. अर्थसंकल्पाची गोडी वाढविण्यासाठी मिष्टान्न व मिठाई वरील कराचा दर ८ टक्क्यावरुन कमी करून ४ टक्के केला जाईल.

**रेशनच्या केरोसिनवरील फेरविक्रीकर.**

**२३.** सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विकल्या जाणाऱ्या केरोसिनची किंमत ठरलेली असते. तसेच विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी किती नफा आकारावा यावर देखील नियंत्रण आहे. या योजनेद्वारे आम जनतेला केरोसिन कमी किंमतीत मिळावे ही अपेक्षा असते. ह्या केरोसिनच्या फेरविक्रीवर दिनांक १ मे २००२ पासून फेरविक्रीकर लागू झाला आहे. रेशनच्या केरोसिनवरील फेरविक्रीकर रद्द करावा असे मी प्रस्तावित करतो.

**शेतीची औजारे.**

**२४.** सध्या शेतकऱ्याला ३००० रुपयांपर्यंत किंमतीच्या अवजारांवर विक्रीकर लागत नाही. ही मर्यादा घालून बरीच वर्षे झाली. शेतीचा उत्पादन खर्च कमीत कमी रहावा यासाठी आमचे शासन नेहमीच प्रयत्नशील आहे.

शेतीचा वाढलेला खर्च आणि भाववाढ लक्षात घेता ही मर्यादा रुपये १०, ००० इतकी करण्याचे मी ठरविले आहे. पारंपरिक पध्दतीने केल्या जाणाऱ्या शेतीसाठी लागणारी सर्व औजारे यामुळे करमुक्त होतील.

**शेतीच्या उपयोगाकरीता वापरण्यात येणाऱ्या ट्रेलर्सवर कर आकारणी.**

**२५.** शेती उपयोगासाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रेलर्सवर सध्या ट्रेलरच्या ओझ्यासहीत ४५०० कि. ग्रॅ. पेक्षा अधिक परंतु, ७५०० कि.ग्रॅ. किंवा त्यापेक्षा कमी वजन असलेल्या अशा ट्रेलर्सवर वार्षिक रुपये १५०० व ट्रेलरच्या ओझ्यासहीत ७५०० कि. ग्रॅ. पेक्षा अधिक वजन असेल अशा ट्रेलर्स वर वार्षिक रुपये ३००० एवढा वाहन कर आहे. शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी हा कर रद्द करण्याचे मी ठरविले आहे.

**अभय योजना.**

**२६.** शासनाने यापूर्वी १९९५ व १९९९ साली दोनवेळा अभय योजना जाहीर केल्या होत्या व दोन्ही वेळी या योजनेस उत्तम प्रतिसाद मिळाला होता. मूल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीची पूर्वतयारी म्हणून जुन्या थकबाकीची वसुली करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने एक अभययोजना मी प्रस्तावित करीत आहे. नवीन योजनेमध्ये व्याज, शास्ती आणि कराची वादग्रस्त रक्कम यापोटी सवलत द्यायचे ठरविले आहे. या योजनेमध्ये खालील अधिनियमांखालील थकबाकीसाठी सवलत घेता येईल :—

मुंबई विक्रीकर अधिनियम, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, कार्यकंत्राट कर अधिनियम, भाडेकरार कर अधिनियम, ऊस खरेदी कर अधिनियम, मोटरस्पिरीट विक्रीकर अधिनियम, मोटार वाहनांवरील प्रवेशकर अधिनियम, कोणत्याही वस्तूंवरील प्रवेशकर अधिनियम आणि ऐष आरामकर अधिनियम योजना चार महिन्यांकरीता चालू असेल. या अभययोजनेचे स्वरुप स्पष्ट करणारा शासन निर्णय दिनांक १ जून २००४ रोजी निर्गमित होईल. महाराष्ट्रातील करदाते या योजनेचा फायदा घेतील आणि ती यशस्वी करतील अशी मला खात्री आहे.

कार्यकंत्राटकर आणि कापड प्रक्रिया उद्योग.

**२७.** मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडे कार्यकंत्राट अधिनियमाखाली दिलेल्या निर्णयामुळे कापडावर प्रक्रिया करतांना वापरलेली रसायने वगैरे गोष्टींवर कार्यकंत्राट अधिनियमाखाली कर लागेल. कापड प्रक्रिया उद्योगाच्या प्रतिनिधींनी असे निवेदन दिले आहे की, पूर्वीची थकबाकी वसूल करण्याचे प्रयत्न झाले तर या उद्योगाचे अस्तित्वच धोक्यात येईल. ह्या उद्योगामध्ये प्रत्यक्षरित्या जवळपास एक लाख लोक गुंतले आहेत. त्याच्याशी संबंधित उद्योगांमध्ये देखील मोठा कामगारवर्ग गुंतला आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेतील कापडप्रक्रिया उद्योगाचे स्थान लक्षात घेता आणि स्थानिक रोजगाराला बाधा येऊ नये म्हणून मी ठरविले आहे की या उद्योगाला ३१ मार्च २००४ पर्यंतच्या कालावधीसाठी कार्यकंत्राट अधिनियमाखाली कर माफी द्यावी. याखेरीज इतर काही प्रक्रिया उद्योग आहेत. उदा. छायाचित्र डेव्हलप करणे आणि छापणे, प्लॅस्टीक वा धातूवर छपाई करणे इत्यादी. त्यांनाही उच्च न्यायालयाचा हा निर्णय सारख्याच प्रकारे लागू पडतो. ह्यापैकी काही प्रकरणांत यापूर्वी कोर्टांचे वेगवेगळे निर्णय आलेले आहेत. ह्या उद्योगांना देखील तशीच सवलत यथायोग्य बदल करून देण्याचे मी प्रस्तावित करतो.

बांधकाम कंत्राट.

**२८.** कार्यकंत्राट अधिनियमात " बांधकाम कंत्राट " या शब्दप्रयोगाचा वापर प्रथम जानेवारी २००० मध्ये केला गेला. अधिसुचीत बांधकाम कंत्राटांच्या या यादीत थोडी भर घालणे आवश्यक आहे. सुधारीत यादी दिनांक १ मे १९९८ पासूनच्या सर्व कालावधीसाठी वापरावयाचे मी ठरविले आहे.

मंडपवाले.

**२९.** भाडे करार अधिनियमामध्ये अवशिष्ट नोंद सन २००१ मध्ये पहिल्यांदा आणली. या मुळे वेगवेगळ्या वस्तू भाड्याने देणारे अनेक प्रकारचे

व्यावसायिक पहिल्यांदाच कर आकारणीस पात्र झाले. लग्न कार्य आणि इतर समारंभासाठी मंडप भाड्याने देणारे जे व्यावसायिक आहेत त्यांनी निवेदन दिले आहे की वस्तुतः त्यांच्या वरील कराचा बोजा फार जास्त आहे. ह्या धंद्यातील व्यावसायिक मुख्यतः अल्पशिक्षित आहेत आणि अकुशल कामगारांना रोजीरोटी देणारा असा हा व्यवसाय आहे. मंडप उभा करण्यासाठी ते ज्या वस्तू वापरतात त्या वस्तुंची आयुर्मर्यादा फार कमी असते. ते जे भाडे आकारतात त्यामध्ये मजूरी आणि वाहतूकीचा वाटा मोठा असतो. त्यांच्या अडचणींचा सहानुभूतीने विचार करणे जरूरीचे आहे. ह्या करदात्यांवरील कराचा दर दीड टक्का इतका करण्याचे मी ठरविले आहे.

**विशेष आर्थिक क्षेत्र.**

**३०.** विशेष आर्थिक क्षेत्रातील घटकांना मुंबई विक्रीकर अधिनियमाखाली खरेदी व विक्रीवरील करातून माफी देण्यात आली आहे. निर्यातीस प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ह्या घटकांना कार्यकंत्राट कर आणि भाडेकरार कर अधिनियमाखाली देखील करमाफीची सवलत देण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

**मच्छिमार सहकारी संस्थांकडून वसुली.**

**३१.** मच्छिमार सहकारी संस्थांच्या डिझेलच्या खरेदीवर पूर्ण करमाफी आहे. या योजनेखाली पूर्वी काही संस्थांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले होते. याला आळा घालण्यासाठी प्रत्येक संस्थेचा डिझेलचा कोटा पूर्वीच ठरवून दिला आहे. या प्रकरणांच्या निर्धारणेच्या वेळी अनेक सहकारी संस्थांवर बरेच करदायित्व आले आहे. गेली ३ वर्षे मासळीच्या अपुऱ्या पुरवठयामुळे मच्छिमारी व्यवसाय अडचणीत आला आहे व या संस्थांची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे.

या प्रश्नाचा विचार करून मी असे ठरविले आहे की, दिनांक ३० सप्टेंबर १९९७ च्या पूर्वीच्या कालावधीसाठी डिझेलच्या खरेदीविक्रीसंबंधात जो कर लागू आहे त्याची वसुली करु नये.

ऊस खरेदीकर. **३२.** राज्यामध्ये गेली तीन वर्षे दुष्काळी परिस्थिती आहे. त्यामुळे साखर उद्योग मोठ्या अडचणीत सापडला आहे. तसेच देशात साखरेचे मुबलक साठे उपलब्ध आहेत. त्यामुळे साखरेची चांगल्या भावाने विक्री होत नाही. शेतकऱ्यांना उसासाठी रास्त दर मिळावा आणि खरेदीकरापोटी कपात होऊ नये म्हणून काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील ऊस शेतकऱ्याला कधी नव्हे इतकी मदतीची आवश्यकता आहे. या विचाराने २००३-०४च्या गळित हंगामासाठी ऊस खरेदीकर माफ करण्याचे मी ठरविले आहे.

ऑटो रिक्षा. **३३.** मालवाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परवाना धारकांना व्यवसायकर भरावा लागतो. मात्र पूर्वीच्या शासनाने १९९९ पासून ऑटोरिक्षाच्या परवाना धारकांवर देखील व्यवसायकर लागू केला. ह्या वर्गांवर कराचा बोजा फार जास्त होतो असे माझे मत आहे. हया व्यवसायात लाखो तरुण लोकांना स्वयंरोजगार मिळतो. ही आकारणी आवश्यक त्या पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्याचे मी ठरविले आहे.

संकिर्ण बाबी. **३४.** ह्या खेरीज वेगवेगळया न्यायानिवाड्यांमुळे व तांत्रिक कारणांसाठी विक्रीकर अधिनियमात काही तांत्रिक सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. त्यादृष्टीने लिलावकर्त्यांची व्याख्या , उलाढालकर, खरेदीकर, अधिभार, निर्धारणा, शास्ती, वजावट, अपराधांची दखल इत्यादीविषयीच्या कलमात मी काही सुधारणा सुचवित आहे. ऐषआरामकर

अधिनियमात देखील सामुदायिक प्रोत्साहन योजना आणि नियम करण्याच्या अधिकारांसंबंधी छोटया सुधारणा सुचविल्या आहेत. प्रवेशकर अधिनियमात हेतू स्पष्ट करण्याच्या दृष्टीने एक सुधारणा सुचवित आहे.

**मुद्रांक शुल्क व नोंदणी.** **३५.** नोंदणी व मुद्रांक विभाग हा राज्य शासनास महसूल मिळवून देणारा दोन क्रमांकाचा विभाग आहे. सन २००३-०४ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ३४०० कोटी एवढा महसूल मिळवून विभागाने गेल्या चार वर्षामध्ये महसुलात ७५ टक्के एवढी विक्रमी वाढ केलेली आहे. ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे.

**नवीन कार्यालये.** **३६.** गेल्या पाच वर्षात नोंदणी व मुद्रांक विभागाने संगणकीकरणाचे काम जवळपास पूर्ण केले आहे. यामुळे सामान्य नागरिकाला केवढी सुविधा मिळाली आहे हे सन्माननीय सभासदांना माहीत आहे. याच वाटेने पुढचे पाऊल म्हणून जनतेला अधिक तत्पर व कालबध्द सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राज्यात तात्काळ २८ नवीन नोंदणी कार्यालये व ५ नवीन विवाह नोंदणी कायार्लये काढण्याचे प्रस्तावित आहे. विशिष्ट दस्त उदा. लिव्ह. ॲन्ड लायसेंस, गहाणखत इ. नोंदणीकरण करण्याचे अधिकार बँकांना प्रदान करण्याचा शासनाचा मनोदय आहे.

**शुल्कामध्ये सूट.** **३७.** नोंदणी शुल्काच्या दरामध्ये कपात करून सुसूत्रता आणण्यासाठी विशेषतः जमीन व व्यापारी मालमत्ता यांच्या संदर्भात होणाऱ्या दस्तांसंदर्भात सद्यःस्थितीत ज्या प्रकरणात मुद्रांक शुल्काचा दर ५ टक्केच्या वर आहे त्या प्रकरणांचा इतर राज्यांच्या संदर्भात तुलनात्मक विचार करून दर कमी करण्याचा निर्णय मी केला आहे. त्याद्वारे स्वतःहून मुद्रांक शुल्क भरण्यास लोकांनी उद्युक्त होणेअपेक्षित आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार ज्या अनुच्छेदाखालील दस्तांवर न्यायिकेतर मुद्रांकांचा वापर होतो त्यासाठी कमीत कमी रुपये १०० एवढे मुद्रांक शुल्क प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापि, शासकीय कार्यालये व न्यायालये यामध्ये जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, वास्तव्याचे तसेच राष्ट्रीयतेचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दाखल करावयाच्या सर्वप्रकारच्या प्रतिज्ञापत्रावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचे देखील प्रस्तावित करीत आहे. त्याचप्रमाणे मुद्रांक शुल्काचा परतावा देण्याची प्रक्रिया अधिक सोपी व सूटसूटीत करून विशिष्ट कालमर्यादेत असा परतावा देण्याचे प्रस्तावित करीत आहे. पतसंस्थांमधून दिल्या जाणाऱ्या सोने तारण कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचे प्रस्तावित आहे.

विभागाची कामगिरी.

**३८.** राज्य शासनाने नोंदणी व मुद्रांक विभागामध्ये सुरु केलेल्या सर्वंकष सुधारणांची दखल सर्व स्तरावरुन घेण्यात आली आहे. नोंदणी व मुद्रांक विभागास केंद्र शासनाकडून " **ई-गव्हर्नन्स** " मध्ये विशेष पुढाकार घेतल्याबाबत " **गोल्डन आयकॉन अ‍ॅवॉर्ड** " प्रदान झालेले आहे. जनतेला तत्पर व लोकाभिमुख सेवा सातत्याने मिळेल या उद्देशाने विभागाकडून केलेल्या प्रयत्नांमुळे विभागास " **आयएसओ ९००१-२०००** " प्रमाणन मिळालेले आहे.

शिकाऊ अनुज्ञप्ती लॅमिनेटेड कॉर्ड व पक्की अनुज्ञप्ती स्मार्ट कार्डवर देणे.

**३९.** शिकाऊ अनुज्ञप्ती लॅमिनेटेड कार्डवर व पक्की अनुज्ञप्ती स्मार्ट कार्डवर देण्याचा निर्णय शासनाने घेतला असुन याकरिता निविदा मान्य करण्यात आली आहे. हा प्रकल्प येत्या २ महिन्यात कार्यान्वित होईल. पक्क्या अनुज्ञप्तीकरिता अर्जदाराने अर्ज केल्यावर साधारणपणे २ तासात त्यास ती मिळेल. तसेच संपूर्ण राज्यासाठी अनुज्ञप्तीधारकांची माहिती एकत्रित तयार उपलब्ध राहील आणि अनुज्ञप्ती तपासण्यासाठी त्याचा उपयोग प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी करता येऊ शकेल.

४०. गेल्या पाच वर्षातील कामाचा आढावा घेताना माझ्या मनात एक समाधानाची भावना आहे. ह्या कालावधीत राज्याला सतत भीषण दुष्काळाला तोंड द्यावे लागले. सन १९९९ मध्ये कारभार हाती घेतल्यानंतर वित्तीय सुधारणा करण्याचे आमच्या शासनाने प्रामाणिक प्रयत्न केले. या कालावधीत जागतिक व देशाची अर्थव्यवस्था मंदीच्या विळख्यात सापडली होती. तरी सुध्दा अर्थव्यवस्थेची दिशा बदलण्यात आम्हाला यश मिळाले आहे. सामान्य माणसांविषयी सहानुभूती असलेले शासन आता दिल्लीत आले आहे, ही एक आनंदाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर माणुसकीची जाण ठेवून आर्थिक सुधारणा अंमलात आणणारे अग्रेसर राज्य अशीच महाराष्ट्राची किर्ती राहील. याचा मला विश्वास आहे.

**बदलवून टाकू अपुला महाराष्ट्र सारा**
**वर्षवू इथे घामाच्या अहोरात्र धारा**
**ह्याच कातळांना आणू**
**कळा सोनियाची**
**ह्याच माळरानी काढू पिके मोतियांची**
**भुकेल्यास भाकर देवू, अनाथा निवारा!**

समारोप. ४१. माझा पहिला अर्थसंकल्प सादर करतांना मार्च २००० मध्ये मी स्पष्ट केले होते की, राज्याची बिकट आर्थिक स्थिती लक्षात घेता साधनसंपत्ती गोळा करण्यासाठी नवीन मार्ग हुडकण्याची जरुरी आहे. मात्र हे करीत असतांना शेतकरी, कामगार आणि मध्यम वर्गाचे हित कायम लक्षात ठेवले पाहीजे. मी असेही अभिवचन दिले होते की एक आधुनिक करव्यवस्था अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील.

महोदय, आमच्या शासनाचा सन २००४-०५ चा अर्थसंकल्प मी या सदनासमोर मांडला आहे. गेली काही वर्षे महाराष्ट्रातील शासन व केंद्राचे शासन भिन्न पक्षाचे राहिलेले असून त्यामुळे राज्य शासनास अनंत अडचणी उभ्या राहिल्या होत्या व केंद्रातून निधी मिळण्यापासून वेळोवेळी ते वंचित राहत गेले. केंद्रात आता संयुक्त पुरोगामी आघाडीचे शासन आले असून केंद्रात व राज्यात भिन्न पक्षांचे शासन असल्यास विकासाच्या प्रक्रियेवर कसा विपरित परिणाम होतो हे जनतेच्या लक्षात आले आहे म्हणून येत्या निवडणुकीत आपला कौल देताना केंद्रात व राज्यात एकाच विचार प्रणालीचे शासन पुनश्च सत्तेवर आणेल व महाराष्ट्राचे सर्व क्षेत्रातील अग्रेसर स्थान यावश्चंद्रदिवाकरौ कायम राहील याचा मला पूर्ण विश्वास आहे !

**जयहिंद, जय महाराष्ट्र !**